# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

## रीच-3ए येथे पहिल्या सेगमेंटचे यशस्वी लॉन्चिंग




नागपूर : नागपूर मेट्रो रेल प्रकल्पाच्या (फेज-2) रीच-3ए अंतर्गत (लोकमान्य नगर ते हिंगणा : एकूण लांबी 6.4 किमी) निर्माण कार्य जानेवारी 2025 मध्ये सुरू झाले असून या रिच मध्ये वायसीसीई कॉलेज, स्कूल ऑफ स्कॉलर्स, शालिनी ताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर, हिंगणा बसस्टॉप, हिंगणा ग्रामीण रुग्णालयचा समावेश असून या मार्गिकेमुळे पारडी, बुटीबोरी, कन्हान तसेच नागपूर शहराच्या इतर भागांशी दळणवळण अधिक सुलभ होणार आहे.

या रीच-3 ए मध्ये एकूण 230 स्पॅन असून यामध्ये 120 मीटर लांबीचा स्पॅनही समाविष्ट आहे, जो हिंगणामधील वीणा नदीवर उभारल्या जाणार आहे. या रिच मधील सिव्हिल कार्य 24 महिन्यांत पूर्ण करण्याचे नियोजन असून कल्पतरू प्रोजेक्ट्स इंटरनॅशनल लिमिटेड यांच्या वतीने या रिच मध्ये निर्माण कार्य केल्या जाणार आहे.  रीच-3ए येथे सेगमेंट लिफ्टिंगच्या कार्याला आजपासून सुरुवात करण्यात आली आहे. या रिच मध्ये व्हायाडक्ट उभारणीसाठी प्रिकास्ट काँक्रीट सेगमेंट्सचे अचूक लिफ्टिंग आणि प्लेसमेंट करण्यात येत आहे. या रिच मध्ये  31 मीटर लांबीच्या पहिल्या स्पॅनचे

ग्राउंड सपोर्टेड लॉन्चिंग पद्धतीने यशस्वी लाँचिंग करण्यात आले. या स्पॅनच्या उभारणीत 180 घनमीटर M50 ग्रेड काँक्रीट आणि 28.5 टन Fe550D ग्रेड स्टील वापरण्यात आले आहे.

सदर गर्डरचे लॉन्चिंग महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्री. श्रावण हर्डीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. यावेळी संचालक (प्रकल्प) श्री. राजीव त्यागी, कार्यकारी संचालक श्री. अरुण कुमार, श्री.राजेश पाटील  आणि इतर मान्यवर अधिकारी उपस्थित होते.

या 31 मीटरच्या स्पॅनसाठी एकूण 11 सेगमेंट्स एकत्र करून स्पॅन तयार करण्यात आला आहे. शेवटच्या सेगमेंटची रुंदी 1.9 मीटर असून उर्वरित प्रत्येक सेगमेंट 3 मीटर रुंद आहे. प्रत्येक सेगमेंटचे वजन 40 ते 45 टन दरम्यान आहे. प्रत्येक सेगमेंट कास्टिंग यार्डमधून ट्रेलरद्वारे निश्चित मार्गाने कामाच्या स्थळी नेण्यात येतो. ट्रेलरसोबत पेट्रोलिंग वाहन व ट्राफिक मार्शल्स नियुक्त करून वाहतुकीच्या सुरक्षिततेची विशेष काळजी घेतली जाते.

250 टन क्षमतेच्या क्रेनद्वारे हे सेगमेंट उचलले जात आहे. संपूर्ण प्रक्रियेत लिफ्टिंग प्लॅन, जोखीम मूल्यांकन, प्रमाणित उपकरणे व प्रशिक्षित कर्मचारी यांचा वापर करून सुरक्षिततेचे काटेकोर पालन केले जात आहे. ग्राउंड सपोर्टिंग सिस्टम वापरून एक स्पॅन पूर्ण करण्यासाठी – ज्यामध्ये सर्व सेगमेंट्सचे लिफ्टिंग, ड्राय मॅचिंग, अलाइनमेंट, ग्लूइंग, पोस्ट-टेंशनिंग आणि स्पॅन लोअरिंग यांचा समावेश आहे. या करिता एकूण 7 दिवसांचा कालावधी लागतो..

